अंबू : इथं राहिलें म्हणून काय झालं ? माझं आणि अण्णांचं रेशन काढलं आहे—फुकट नाहीं कांहीं जेवीत मी !

जयंता : मग राहा—पण माझ्या मागचा तुझा पिंगा बंद कर.

अंबू : तुमचे भाऊकाकासुद्धां या लग्नाला तयार आहेत. लग्ना आपला फोटो देखील छापणार आहेत म्हणे ते आपल्या " ऐरावत " म

जयंता : मग सध्यां तुझा छापायला सांग.

अंबू : एकटीचाच ?

जयंता : हो—म्हणावं फोटो छापा आणि खालीं " वर पाहिजे " लिहा. लग्न केल्यास जांवयाला जन्मभर मासरा गाणं फुकट शिकव म्हणावं—जा.

[ जातो. अंबू हतबुद्ध होऊन थोडा वेळ दरवाजांतच उभी राहाते. दामुअण्णा—अंबूचा बाप—अंगांत एक अघळपघळ कोट घालून व डोक्यावर पूर्वीं घडीची पण आतां बाटोळी झालेली टोपी घालून माडीवरून येतात. येतांना ते खिशांतले चणे खात येतात. ]

अण्णा : काय अंबे, कुणाची वाट बघते आहेस ? गेला वाटतं जयंता ?

अंबू : आतांच गेले ते.

अण्णा : मग येवढ्यांत कसा येईल ? आल्यावर त्याच्या आसपास राहा जा. अग, कष्टाशिवाय फळ नाहीं मिळत. चणे खावे लोखंडाचे ! दह दहा तास खांसाहेबांच्या घराच्या खालीं उभा राहायचा मी दोन पायांवर केव्हां केव्हां वरून विड्याची चूळ टाकीत ती देखील पडायची अंगावर म्हटलं, तरी हरकत नाहीं. अभिषेक होतो आहे हा आपल्यावर. तेव्ह ही विद्या साध्य झाली बरं. ( कुठली तरी तान घेतात आणि उघडलेल्य तोंडात शेंगदाण्याचा बोकणा भरतात. )



बू : पण हें गाणं नाहीं—नवरा आहे हा.

ण्णा : हं—मग अगदींच सोपं काम. संगीत विद्या म्हणजे असाध्य ठा—सात जन्म नाहीं पुरायचे ती हस्तगत व्हायला. नवरा काय—हुं:

बू : हो—हुं: ! सहा महिने होत आले इथं येऊन मला.

ण्णा : मी बारा वर्षे काढलीं खांसाहेबांकडे !

बू : आणखी बारा वर्षांनीं माझ्याकडे कुणी ढुंकून तरी पाहील ?

ण्णा : कांहीं नेम नाहीं सांगवत. आणखी कांहीं वर्षांनीं तिशीच्या ढचीच जून मुलगी पाहायची फॅशन निघेल या पोरांची !

बू : हो, निघते आहे. सध्यां मात्र लग्न न करण्याचीच फॅशन् निघाली हे ! म्हणे कम्युनिझम माहीत आहे ? डॉलरची किंमत माहीत आहे ? जणूं य, लग्नाला कम्युनिझम् आणि डॉलर लागतो !

ण्णा : अग, वर्तमानपत्रवाल्याचा पोरगा आहे तो ! आणि तशात म्युनिस्ट ! रशियांत पाऊस पडला, कीं हे हिंदुस्थानांत छत्र्या उघडायचे !

बू : पण आतां किती दिवस मी त्यांची मनधरणी करीत राहूं ? मला र बाई कंटाळा आला आहे.

ण्णा : जरा दम धर—अशी एकेरीवर येऊं नकोस.

बू : हो—तुम्हांला काय झालं सांगायला ? म्हणे दम धर. आता म शिल्लकच उरला नाहीं. तुम्हीं भाऊकाकांना तरी सांगून पाहा.

ण्णा : बा:, मधून मधून सांगतोच आहे कीं मी. पण परवांच ारलेकांची जुगलबंदी झाली आहे—तेव्हां सध्यां दोघांपैकीं कुणाच्याच ाटेला जाण्यांत अर्थ नाहीं.

बू : खरंच अण्णा—कशाबद्दल भांडत होते हो दोघे ? मला तर क्षर देखील कळलं नाहीं.

अण्णा : आणि त्यांना तरी कुठं कळलं आहे ? काय म्हणे, हिंदुस्थान कॉमनवेल्थमध्यें राहिला ही कॉंग्रेसनं घोडचूक केली कीं शहाणपणा केला !